**वाचा** :- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील क्रमांक संकिर्ण - २०२२/ प्र. क्र. ३९१ / ल-१,
दिनांक,२७ सप्टेंबर, २०२४

---

क्र./भूमापन-२ / मो. फी दर व संवर्ग सुधारणा / प्र.क्र.२२१ /२०२३ पुणे, दिनांक /१०/२०२४

**विषय :- मोजणी फी दर व संवर्ग सुधारणा आणि सुलभीकरण करणे बाबत.**

**आदेश**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १३६ मधील कलम १९६६, व महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सीमा चिन्हे) नियम. १९६९ मधील नियम १३(२) मधील तरतुदी नुसार या कार्यालयाकडील आदेश,**१)** क्रमांक - एलआर २२७ / सीआर ३९२६ / भू - ३/ २००१, दिनांक, ३०/१०/२००१, **२)** क्रमांक - एलआर २२७/ सीआर ३९२६ / भू -३ / २००१, दिनांक, ७/०१/२००२, **३)** क्रमांक - एलआर २२७/ सीआर ३९२६ / भू -३/ २००३, दिनांक, ११/०७/२००३, **४)** क्रमांक - एलआर २२७/सीआर ३९२६/ भू - ३/२००७, दिनांक,२४/०४/२००७, **५)** क्र. भूमापन-३/ मोजणीफी / प्र.क्र. २५५/१०, दिनांक, ०६/०२/२०१० व **६)** क्र. भूमापन ३ / विनोंक्र ६५/२०१२, दिनांक, १७/१०/२०१२ व **७)** क्र. भूमापन २ / प्र.क्र. ०९/ अति अति ता.मो.फी. / २०१७, दिनांक, २४/११/२०१७ अन्वये साधी, तातडी, अतितातडी आणि अतिअतितातडी मोजणीचे संवर्ग व मोजणी फी चे दर निश्चित करणेत आलेले होते. त्यानंतर प्रशासकीय खर्चामध्ये मोठया प्रमाणावर झालेली वाढ लक्षात घेता प्रचलित मोजणी फी दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तसेच मोजणी संवर्ग व कालावधी मध्ये विविध प्रकार निर्माण झाल्यामुळे जमीन धारकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने त्यामध्ये सुलभीकरण करणे अनिवार्य झालेले आहे. ही बाब विचारात घेऊन मोजणी फी चे प्रचलित दरामध्ये, संवर्ग व कालावधी मध्ये सुधारणा करून, खालील प्रमाणे मोजणी संवर्ग व कालावधी व त्यास अनुसरून मोजणी फी निश्चित करणेत येत आहे.

**१. महानगरपालिका / नगरपालिका हद्दी बाहेरील क्षेत्राचे जमीन मोजणीसाठी**

| अ. क्र. | मोजणीचा प्रकार | नियमित | द्रुतगती |
|---|---|---|---|
| १ | एक किंवा समान धारक किंवा धारकांचे एक सर्व्हेनंबर / गटनंबर / पो.हि./ न.भु.क्र./फायनल प्लॉट क्रमांक/मंजुर रेखांकनातील एका भूखंडासाठी **दोन हेक्टर** मर्यादेपर्यत | रू.२,०००/- | रू.८,०००/- |
| २ | त्याच एक सर्व्हेनंबर./गट नं./ पो.हि./ न.भु.क्र./ फायनल प्लॉट क्रमांक /मंजुर रेखांकनातील परिच्छेद १/१ मध्ये नमुद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरीत प्रत्येक **दोन हेक्टर** क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास | रू.१,०००/- | रू.४,०००/- |

**टीप** :- त्याच धारकांचे लगत जमिनीचे एक सर्व्हेनंबर / गटनंबर / पो.हि./ न.भु.क्र./ फायनल प्लॉट क्रमांक /मंजुर रेखांकनातील एका भूखंडासाठी वरील १/१ व १/२ मध्ये नमुद केल्या प्रमाणे मोजणी फी आकारणी करावी.

**२.महानगरपालिका / नगरपालिका हद्दीमधील असलेल्या क्षेत्राचे जमीन मोजणीसाठी**

| अ. क्र. | मोजणीचा प्रकार | नियमित | द्रुतगती |
|---|---|---|---|
| १ | एक किंवा समान धारकांचे एक सर्व्हेनंबर / गटनंबर / पो.हि./ न.भु.क्र. /फायनल प्लॉट क्रमांक /मंजुर रेखांकनातील प्रत्येक भूखंडासाठी **एक हेक्टर** चे मर्यादेपर्यंत | रू.३,०००/- | रू.१२,०००/- |
| २ | त्याच एक सर्व्हेनंबर/गटनंबर/पो.हि./न.भु.क्र./ फायनल प्लॉट क्रमांक /मंजुर रेखांकनातील परिच्छेद २/१मध्ये नमुद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरीत प्रत्येक **एक हेक्टर** क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास | रू.१,५००/- | रू.६०००/- |

**टीप** :- त्याच धारकांचे लगत जमिनीचे एक सर्व्हेनंबर /गटनंबर/पो.हि./न.भु.क्र./ फायनल प्लॉटक्रमांक / मंजुर रेखांकनातील एका भूखंडासाठी वरील२/१ व २/२ मध्ये नमुद केल्या प्रमाणे मोजणी फी आकारणी करावी.

**३. कंपन्या/इतर संस्था / विविध प्राधिकरणे/ महामंडळे व भूसंपादन संयुक्त मोजणीसाठी**

| अ.क्र. | मोजणीचा प्रकार | नियमित | द्रुतगती |
|---|---|---|---|
| १ | एक किंवा समान धारकांचे एक सर्व्हेनंबर /गटनंबर / पो.हि./ न.भु.क्र./ फायनल प्लॉट क्रमांक/मंजुर रेखांकनातील एका भूखंडासाठी **एक हेक्टर** मर्यादेपर्यंत | रू.३,०००/- | रू.१२,०००/- |
| २ | त्याच एक सर्व्हेनंबर/गटनंबर/पो.हि./न.भु.क्र./फायनल प्लॉटक्रमांक/ मंजुर रेखांकनातील परिच्छेद ३/१ मध्ये नमुद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरीत प्रत्येक **एक हेक्टर** क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास | रू.१,५००/- | रू.६,०००/- |

**टीप** :- त्याच धारकांचे लगत जमिनीचे एक सर्व्हेनंबर / गटनंबर/ पो.हि./न.भु.क्र./ फायनल प्लॉट क्रमांक /मंजुर रेखांकनातील एका भूखंडासाठी वरील ३/१ व ३/२ मध्ये नमुद केल्या प्रमाणे मोजणी फी आकारणी करावी.

**४. एकाच अर्जदाराने मोजणी करून मागितलेली जमीन लगत नसल्यास स्वतंत्रपणे मोजणी अर्ज स्विकारून कार्यवाही करावी.**

**५. कोर्ट कमिशन मोजणी साठी वरील अनुक्रम १,२ व ३ प्रमाणे फी आकारणी करण्यात यावी.**

**६. सामिलीकरण मोजणी साठी वरील अनुक्रम १,२ व ३ प्रमाणे फी आकारणी करण्यात यावी.**

**७. कोर्ट वाटप / पोटहिस्सा मोजणी :-**

कोर्टवाटप/पोटहिस्सा मोजणी कामी नियमानुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतरअशा प्रकरणात संपुर्ण सर्व्हे नंबर/गटनंबर/ पो.हि./न.भु.क्र या करिता उपरोक्त नमूद केलेल्या अनुक्रम १, २ व ३ मध्ये नमूद केल्या प्रमाणे प्रथम मोजणी फी ची आकारणी करुन त्यानंतर पोटहिस्स्याची आकारणी करतांना पहिला पोटहिस्सा वगळून उर्वरित प्रत्येक पोटहिस्स्याकरीता नियमित मोजणी फी र.रु. १,०००/- व द्रुतगती मोजणी फी र.रु.४,०००/- इतकी पोटहिस्सा मोजणी फी आकारणी करणेत यावी.

**८. पुनर्भेट :-**

पुनर्भेट मोजणी फी ही मुळमोजणी वेळी भरणा केलेल्या ५० % अथवा रक्कम रुपये १०,०००/- यापैकी जी कमी असेल ती आकारण्यात यावी.

**९. उच्चतपासणी (निमताना मोजणी) :-**

१) अधिनस्त भूकरमापक / परिरक्षण भूमापक यांनी केलेल्या मोजणी कामाची उच्चतपासणी ( निमतानामोजणी ) उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगरभूमापन अधिकारी यांनी करावयाची असल्यास मुळमोजणी प्रकरणी प्रत्यक्ष भरलेल्या मोजणी फी च्या **तीनपट** दराने मोजणी फी आकारणेत यावी.

२) उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगरभूमापन अधिकारी यांनी केलेल्या निमताना मोजणी कामाची तपासणी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख या संवर्गातील अधिका-याकडून उच्च पातळीवर करण्यात येणा-या निमताना मोजणीसाठी मोजणी फी चे दर मुळमोजणी प्रकरणी प्रत्यक्ष भरलेल्या मोजणी फी च्या **पाचपट** दराने आकारणेत यावी.

**१०.शासकीय मोजणी :-**

शासकीय मोजणी परिच्छेद क्र. १, २ व ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे नियमित दराने मोजणी फी आकारणेत यावी. यापूर्वी महाराष्ट्र शासन स्तरावरून मोजणी फी मध्ये सवलत देणेत आलेली आहे, अशा प्रकरणात ती पुढील आदेशापर्यन्त लागू राहील. तसेच या पुढील कालावधीत मोजणी फी मध्ये सवलत देणेबाबत महाराष्ट्र शासन स्तरावरून आदेश प्राप्त झालेनंतर त्यानुसार कार्यवाही करावी.

**११. गुंठेवारी मोजणी :-**

महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधीनकरणे , श्रेणीवाढ व नियंत्रण) व अधिनियम २००१ मधीलकलम ३ (१) अंतर्गत प्राप्त होणा-या मोजणी प्रकरणामध्ये महानगरपालिका व नगरपालिका हद्दीबाहेरील भूखंडासाठी परिच्छेद १ मधील नमुद मोजणी फी चे दिडपट दराने मोजणी फी आकारण्यात यावी. महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील मोजणी प्रकरणांसाठी परिच्छेद क्रमांक२ मध्ये नमुद मोजणी फीचे दिडपट दराने मोजणी फी आकारण्यात यावी. मोजणी फी ही मोजणी करावयाच्या भुखंडाची आकारण्यात यावी. परंतु मोजणी करतांना मात्र संबंधीत सर्व्हेनंबर / गटनंबर मधील संपुर्ण क्षेत्राची मोजणी करण्यात यावी.

**१२. मोजणीचे संवर्ग व कालावधी :-**

मोजणीचा संवर्ग व कालावधी यामध्ये शेतकरी व जमीन धारकांमध्ये संभ्रम निर्माण होतअसल्याने त्यामध्ये सुलभीकरण तसेच कालानुक्रमे त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील प्रमाणे मोजणीचा संवर्ग व कालावधी निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मोजणीचा संवर्ग | कालावधी |
|---|---|---|
| १ | नियमित | ९० दिवस |
| २ | द्रुतगती | ३० दिवस |

**१३**. सदर आदेशाची अमंलबजावणी, दि. ०१/११/२०२४ पासुन करणेची आहे. या तारखेपुर्वी मोजणी फी सह

प्राप्त झालेल्या परिपूर्ण अर्जास वरील दर लागू होणार नाहीत. मात्र, दि. ०१/११/२०२४ रोजी किंवा त्यानंतर प्राप्त होणा-या मोजणी प्रकरणास / अर्जास वरील दर लागू होतील.

१४. वर नमूद केलेले मोजणी फी चे सुधारीत दर पुढीलआदेशापर्यंतअंमलात राहतील. त्याच प्रमाणे सदरचे मोजणी फी चे दर सुधारीत करणेस पात्र राहतील.

**Signed by Sachindra Pratap Singh**
**Date: 11-10-2024 17:18:58**

**(सचिंद्र प्रताप सिंह) भा.प्र.से.**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे**

प्रत : मा. अप्पर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनयसादर.

प्रत : स्वीय सहाय्यक, जमाबंदी आयुक्त आणि संचालकभूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी.

प्रत : स्वीय सहाय्यक अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त पुणे, मुंबई, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत : जिल्हाधिकारी पुणे, सातारा, सांगली , कोल्हापूर , सोलापूर , मुंबई उपनगर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर,नाशिक, धुळे , जळगांव, नंदूरबार, अहमदनगर, छ.संभाजीनगर, परभणी, धाराशीव, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, बीड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत : उप संचालक भूमि अभिलेख, पुणे, मुंबई, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत : प्राचार्य,भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छ.संभाजीनगर यांना माहितीसाठी.

प्रत : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे, सातारा, सांगली ,कोल्हापूर, सोलापूर, मुंबईउपनगर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे , जळगांव, नंदूरबार, अहमदनगर, छ.संभाजीनगर, परभणी, धाराशीव, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, बीड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

२/- आपल्या अधिनस्त उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगरभूमापन अधिकारी कार्यालयांना सदर आदेशाची प्रत पुरविण्यात यावी.

प्रत : उप अधीक्षक भूमि अभिलेख, सर्व / नगर भूमापन अधिकारी, सर्व यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत : कार्यालय अधीक्षक, सर्व जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांना माहिती साठी.

**" निर्गमित "**

**Signed by Kamlakar Sudhakarrao Hattekar**
**Date: 11-10-2024 18:08:42**
**(कमलाकर हट्टेकर)**
**उपसंचालक भूमि अभिलेख,संलग्न**
**जमाबंदी आयुक्त (भूमापन) पुणे**